International Journal of Research in Economics and Social Sciences(IJRESS)
Available online at: http://euroasiapub.org
Vol. 7 Issue 9, September- 2017,
ISSN(o): 2249-7382 | Impact Factor: 6.939|

# मराठीतील अभंग वाङ्:मयाचे स्वरूप

**डॉ. भारती खापेकर**
सहयोगी प्राद्यापक व
मराठी विभग प्रमुख,
धनवटे नॅशनल कॉलेज, नागपूर

## प्रास्ताविक

२१ वे शतक हे विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे शतक आहे माणसाने खूप प्रगती केली आहे. परंतु ही प्रगती मानवाने काही एका क्षणात केली नाही. त्यासाठी हजारो वर्षाचा कालखंड गेला. व कित्येक पिढ्या निघून गेल्या. अगदी सुरूवातीच्या युगात माणूस जंगलात भटकत होता मानसाचा अनंत काळापासून सुरू असलेला प्रवास पाहिला की मन थक्क होते या मनामुळे मानवाला आपले विचार प्रकट करण्यासाठी भाषेची गरज भासली.

“भाषेची निर्मिती गरजेतून झाली मानवाने आपला विचार व भावना व्यक्त करण्याचे साधन घडविण्याची खटपट अनेक प्रकारे चालू होती. अशा साधनांतून अनेकविध कला कारागिरींचा जन्म झाला”[१] म्हणजेच आपल्या जीवनामध्ये भाषेला महत्व आहे. भा ोशिवाय आपण आपल्या जीवनाचा विचार करू शकत नाही. भाषेमुळे माणूस आपल्या भावभावना व्यक्त करतो. भाषा ही एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जात असते. भावनांचे आदान प्रदान करण्याचे महत्वाचे साधन मराठी संतांनी अभंगरचनेची निर्मिती केली. अभंग हा मराठी साहित्यात निर्माण झालेला साहित्य प्रकार आहे. वारकरी संप्रदायातील या छंदाचा उपयोग करून जनमानसात क्रांती घडवून आणली. उपलब्ध असलेल्या प्राचीन साहित्यावरून असे लक्षात येते की ओवी आणि अभंग मराठीतील सर्वात जुने लोकप्रिय छंद आहे. मुकुंदराजांने ओवी रूपाने मराठी कवितेचे दालन सुरू करून आद्यकविचा मान आणि वारकरी संप्रदायातील संतांनी अभंग काव्य प्रकार संमृध्द केला.

## मराठी अभंग काव्यप्रकाराचे स्वरूप

आपल्या भाषेच्या साहित्यामध्ये गद्य व पद्य असे प्रकार आहेत. आपण सहजपणे एका मागून एक वाक्य बोलतो या सहजपणे बोलण्याला गद्य म्हणतात. आणि पद्य म्हणजे सहज स्वाभाविक बोलने नसते त्यासाठी शब्दांची विशिष्ट पध्दतीने रचना करावी लागते. “काव्य किंवा साहित्य हा कल्पना आणि भावना यांना प्रदिप्त झालेल्या मानवी बुध्दीचा सर्वोत्तम विलास होय”[२]“श्री शंकराचार्याच्या अव्दैतमतात मराठी प्रचार करण्याचा बहुमान मुकुंदराजांकडे जातो. त्यांचे विवेकसिंधू व परमामृत हे ग्रंथ ओवीबध्द आहे. “महाराष्ट्रशारदा ही प्रारंभापासून अध्यात्माचे शुभ्र वस्त्र परिधान करून ओवीच्या चर्तुदलात्मक कमलावर विराजमान झाली आहे”[३] नंतर संत ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायाचा पाया रचला मराठी वाङ्:यामध्ये ज्ञानेश्वरीचे स्थान मोलाचे आहे. “ज्ञानेश्वरीमध्ये असलेल्या असंख्य ओव्यांची रचना भिन्नभिन्न अक्षरसंख्येची आहे. यामध्ये अत्यचरण लघु किंवा अष्टमात्रक असत्याची लकब अधिक अंशाने आढळते”[४]

महानुभावांच्या लिळाचरित्रातील छांदस रचना आपण पाहिली तर त्या ठिकाणी “सात आठ अक्षरांचा चरणही आढळतो तसेच पाच अक्षराचे चरणही आढळतात. अधिकाक्षरी चरणात चरणान्ती यावयाची मात्राची कुस जाते किंवा अक्षरांचे उच्चार आखुड तरी होतात अंत्य दिडका चरण बहुधा चतुराक्षरी आहे”[५] लिळाचरित्र हा मराठीतील पहिला चरित्रग्रंथ आहे. एक आदर्श चरित्रग्रंथ म्हणून लिळाचरित्राचे स्थान मराठी वाड्:मयामध्ये महत्वाचे आहे. त्या काळात ग्रंथगत ओवी, कंठगत ओवी असे दोन प्रकार होते.

या छंदीबद्दल ना. ग. जोशी म्हणतात “निर्विवादपणे लौंकिक असलेली मराठी रचना म्हणजे ‘ओवी’ आणि ‘अभंग’ ही होय ग्रांथिक ओवी त्याचेच मुक्त रूप आहे. जात्यावरील ओव्या, दळणकांडण करताना म्हणावयाच्या ओव्या आणि वारकऱ्यांचे अभंग अभेदाचा आहे. ओवीहेच मालारूप अभंग नावाने ओळखले जाऊ लागले.‘ओवी’ आणि अभंग या दोन्ही छंदात मराठी कविता अविष्कृत झालेली आहे. ओवी या मालिकेला अभंग म्हणतात हे खरे असले तरी अभंग नावाची खास रचनाही आढळते संत ज्ञानेश्वरांनी सुरू केलेली वारकरी संपप्रदायाची परंपरा पुढे नेणाऱ्या अनेक संतांनी विठ्ठल भक्तीची परंपरा समोर नेली.

भक्तीची उत्कटता आणि सुगुणोपासना यातून अभंगाची निर्मिती झाली अभंग म्हटला की विठ्ठल भक्तीचा वाहणारा अखंड झरा अभंग हे संत साहित्याचे वैशि ट आहे.

ओवी प्रमाणे अभंग छंदात संतांनी विपुल अभंग रचना केली आहे. ज्ञानदेवांवासून तुकारामापर्यंत अनेक मराठी संतकवींनी आपल्या आत्मानुभूतीच्या अभिव्यक्तींसाठी अभंगाचे माध्यम वापरले, ओवीतून त्यांनी परमार्थानुभव व्यक्त केला. अभंग वाड्:मय म्हणजे मराठी संतांच्या पारमार्थिक आत्मचरित्राच्या अनुभूतीचा दरवळणारा सुगंध आहे असे म्हणावे लागेल. जनाबाई, मुक्ताबाई, सोयराबाई, बहिणाबाई अशा अनेक संतकवयत्रींनी अभंगरचना केली आहे.”[६] अशा प्रकारे ओवी आणि अभंग हे दोन संतसाहित्याचे माध्यम आहे ओवी आणि अभंग या दोन छंदानी संत वाड्:मय लोकांपर्यंत पोहचले.

वि. सा. खेचर हे अभंगरचना तत्राचे आचार्य होते त्यांनीच नामदेवाला शास्त्र शिकविले अभंगाच्या कले विषयी संत नामदेव लिहितात

“अभंगाची कळा नाही मी नेणत। त्वरा केली प्रीत केशीराजे।।
अक्षरांची संख्या बोलले उदंड। मेरू सुप्रचंड शर आदी।।
सहा साडेतीन चरण जाणावे। अक्षरे मोजावी चौकचारी।।
पहिल्या पासोनी तिऱ्या पर्यंत। अठरा गणित मोज आले।।
चौकचारी आधी बोललो मातृका। बावीसाची संख्या ेवटील।।
दीड चरणाचे दीर्घ ते अक्षर । मुमुक्ष चिार बोध केला।।
नामा म्हणे मज दीले स्वप्न हरी। प्रीतीने खेचरी केली आज्ञा ।।”[७]

अभंगाच्या प्रकारानुसार अभंगाचे रचनाशास्त्र असते. अभंगाचे मुख्य दोन प्रकार आहेत. अभंगाचे वर्गीकरण आशयानुसार विविध प्रकारामध्ये होते. "प्रत्येक अभंगाची रचना स्वतंत्र व बांधेसूद असते संपूर्णता व स्वतंत्रता हे अभंग रचनेचे वेगळेपण आहे."[८]

अभंगाचे दोन प्रमुख प्रकार आहेत एक मोठा अभंग व दुसरा लहान अभंग मोठ्या अभंगाचे नाव देवव्दार आहे

उदा.

"देवाचियेव्दारी उभा क्षणभरी । तेणे मुक्तीचारी साधिलिया ।।१।।
हरी मुखे म्हण हरी मुखे म्हणा । पुण्याची गणना कोण करी ।।२।।
असोनि संसारी जिव्हे वेगु करी । वेदशास्त्र उभारी बाह्य सदा ।।३।।
ज्ञानदेवे म्हणे व्यासाचिये खुणे । व्दारकेच राणे पांडवाघरी ।।४।।"[९]

मोठ्या अभंगात चार चरण असतात पहिल्या तीन चरणात सहा अक्षरे व चवथ्या चरणात चार अक्षरे असतात दुसऱ्या व तिसऱ्यांच्या शेवटी यमक असते.

लहान अभंगाचे नाव देवीवर आहे

"रूप पाहता लोचनी । सुख झाले वे साजणी ।।
बहुता सुकृताची जोडी । म्हणून विठ्ठल आवडी ।।
सर्व सुखाचे आगरू ।बाप रखुमा देविवरू ।।"[१०]

लहान अभंगाचे दोन चरण असतात प्रत्येक चरणात आठ अक्षर असतात पण हे बंधन काटेकोर पाळलेले नसते.

**अभंग छंदाचे इतर प्रकार**

अभंग छंदाचे इतरही प्रकार आहेत अभंगाची रचना वेगवेगळ्या छंदात आढळते समछंद, कपिविरछंद, वनहरिणी छंद, हरिभारीणी छंद, वैकुंठ छंद, लवंगलता चंद्रकला छंद असे उपप्रकार आहे. जीव तू प्राणतू, आत्मा तू विठ्ठला अशी साधी रचनाही आढळते. या शिवाय अक्षरगणवृत्त साळी कटाव दिंडी इत्याइी छंदाचा उपयोग होतो. याशिवाय अक्षरगणवृत्त, मात्रावृत्त, मुक्ताछंद असे तीन प्रकार आहेत. परंतु संताच्या अभंग रचनेमुळे अभंग छंद मराठी वाङ्:मय विख्यात प्रभावीपणे ठरल्या गेला.

अशा प्रकारे संत नामदेव, संत ज्ञानेश्वर या संतापासून अभंग लेखनाला सुरूवात झाली. पुढे अनेक संतानी अभंग लिहिले. यामध्ये तुकारामांच्या अभंगाचा उल्लेख करावा लागतो. प्राचीन मराठीतील श्रेष्ठ अभंगकार म्हणून तुकाराम महाराजांचा उल्लेख करावा लागतो. उठरा पगड जातीतील संतांनी अभंगरचना केली आहे. या काळातील अभंग रचनेला विषय भक्ती आहे. पुढे आधुनिक काळात प्रखर सामाजिक

**International Journal of Research in Economics and Social Sciences(IJRESS)**
Available online at: http://euroasiapub.org
Vol. 7 Issue 9, September- 2017,
ISSN(o): 2249-7382 | Impact Factor: 6.939|

जाणिवा अभंगामध्ये आल्या महात्मा फुले, ना. वा. टिळक, लक्ष्मीबाई टिळक, माधव ज्युलियन, कुसुमाग्रज, वा. भ. बोरकर, विं. दा. करंदीकर, क. मु. शिंदे, मधुकर केचे यांनी ग. दी. माडगूळकर, पी. सावळासाम, ाांताराम आठवले यांनी अभंग रचना केली आहे.

## अभंगाची वैशिष्ट्ये

अभंग या छंदामध्ये संतकवीनी काव्य रचना केली संतांची अभंगवाणी आजही प्रसिध्द आहे. आपल्या मनातील भावभावना सहजपणे स्पष्ट करणारा हा काव्यप्रकार आहे.

ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेवपासष्टी ह्या तत्वनिरूपणात्मक ग्रंथामध्ये असलेली ज्ञानदेवांची जी भूमिका प्रेरणा आहे तिचे त्यांच्या अभंगरचनेमध्ये आहे. आंतरिक संवाद साधण्यासाठी ज्ञानदेवांनी अभंग रचना केली आहे.

संत नामदेवाच्या अभंगाचा विचार केला तर असे दिसून येते की उत्कटभक्ती, सगुणभक्ती, विठ्ठल भक्तीने ओथंबलेली अभंगवाणी दिसून येते. यावरून असे म्हणता येईल लोकजीवनातून अभंग उत्क्रान्त होत गेले. अभंगाचे महत्वाचे वैशिष्ट्य हे आहे की, "अभंग नेहमीच समकालीन जाणिभाविव्यक्तींचे कलात्मक आविष्करण करत आला आहे."[११]

अभंगाचे खास वैशिष्ट्य म्हणजे अभंग हा खास मराठी वाङ्:मयप्रकार आहे. संत तुकारामांनी अभंगाला संमृध्द केले, "तुकारामांनी अभंगाला विकसित केले भावकाव्यात्मक, नाट्यात्मक, कथात्मक आणि चितनात्मक असे वेगवेगळ्या प्रकारचे अभंग तुकारामांनी लिहिले. संत तुकारामांनी भागवत धर्माचे उदात्त स्वरूप आपल्या अभंगातून प्रतिबिंबित केले आहे"[१२]

अभंगाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यात कवी मुद्रिका आढळते बाप रखुमादेवीवरू, नामा म्हणजे एका जनार्दनी, तुका म्हणे वगैरे...

अभंग या काव्य प्रकाराविषयी आपल्याला अजून एक विशेष सांगता येईल की, अभंगातून एखादी कथा सांगितली जाते. "वारकरी पंथाच्या कवितेत पृथकपणे आख्यानकाव्य किंवा महाकाव्यसदृष्य रचना झालेली नसली तरी नामदेवाची आख्याने आणि जनाबाईची तसेच ज्ञानेश्वर आदी आख्यानपर अभंग आहे. "[१३]

भक्तीपूर्ण आणि आत्मनिष्ठ काव्याचे दालन संतांनी उघडले.

## आशय आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीने अभंगाचे मूल्यमापन

संत ज्ञानेश्वर, संत नामदेव या संतांनी सुरू केलेला वारकरी संप्रदाय व अभंगरचनेचा वारसा पुढे अनेक संतकवींनी चालविला परंतु प्रत्येकाचा आशय वेगळा आहे. सगुण निर्गुण अव्दैत ही ज्ञानेश्वरांची जीवनसृष्टी आहे. ज्ञानेश्वरांचे बालक्रिडापर अभंग पाहिले तर आपल्याला लक्षात येते की, श्रीहरीच्या

बालक्रीडा नंदात ज्ञानेश्वरांचे मन रंगून जाते. हे अभंग करताना ज्ञानेश्वरांनी गोपालकृष्णाच्या सवंगडयांचा आणि गोपिकांच्या मनोभूमीकेचा आश्रय घेतला आहे. ज्ञानेश्वरांच्या विरहीणी सर्वांना मोहित करतात संत नामदेवानी आपल्या अभंगातून कथांचे निवेदन केले आहे त्यानंतर अनेक संतांनी अभंगरचना केली पण हया संतमंडळींनी जीवनानुभवातून प्रकट झालेल्या प्रतिमा अभंगातून साकार केल्या प्रपंच आणि भक्ती हयांची सांगड अभंगामधून घातली आहे.

तुकाराम महाराजांनी अधश्रध्दा, भोंदूगीरी बुवाबाजी हयावर टिका कली आहे.

“नका दंतकथा येथे सांगो कोणी
कोरडे ते माणी बोल कोण
अनुभव येथे व्हावा शिष्टचार
न चलती चार आम्हापुढे
निवडी वेगळे क्षीर आणि पाणी
राजहंस होती वेगळात्या
तुका म्हणे येथे पाहिजे जातीचे
येरा गबाळ्याचे काय काम”[१४]

अभंग ६१

अशा प्रकारे सामाजातील कपोलकल्पित कथा आणि अंधश्रध्दा यावर तुकाराम महाराजांनी टिका केली. संत सेना नाव्ही, संत जनाबाई, चोखामेळा, कान्होपात्रा, निवृत्तीनाथ, सोपान, मुक्ताई, विसोबा खेचर, सोयराबाई, सावतामाळी, गोराकुंभार, नरहरी सोनार या सर्वांनी अभंगरचना करून समाजप्रबोधन केले.

“१८१८ नंतर अभंगाचा छंद आशय प्रयोजन सादरीकरणाचे माध्यम या बाबतीत प्रयोगशीलता आणि प्रखर सामाजिक जाणिवा कवींना अभंगाव्दारे व्यक्त कराव्याश्या वाटल्या”[१५]

महात्मा जोतीबा फुले यांनी सामान्य माणूस, माणसाचे वास्तववादी जीवन माणुसकी सारे विषय साहित्यात असावे असा नवा विचार मांडला. महात्मा फुले यांनी आपल्या अभंगातून आर्थिक विषमता जातिभेद शेतकऱ्यांचे प्रश्न मांडलेत. शिक्षणाबद्दल असलेली कळकळ, स्त्रियांच्या शिक्षणासाठी त्यांनी केलेले कार्य त्यांचे अभंग हे समाजसुधारणेसाठी होते. त्यांचे कार्य जनजागरणासाठी होते.

या काळात इंग्रजांचे आगमन झाले या काळामध्ये कवी केशवसुतांनी सुनित रचना केली समाजात सरणाऱ्या रूढीवर प्रहार केला.

केशवसुतांच्या काळात रे. नारायण वामन टिळक आहे त्यांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला ख्रिस्त भक्तीचा आशय अभंगातून व्यक्त केला.

“फुले हासती बोलती । पक्षीराज गाणी गाती ।।

नित्य नवी रम्य प्राची । खाण सर्व सौंदर्याची ।।
तूही माझ्या अंतर्यामी । तुझ्या आवडीचा धार्मी ।।
प्रवर्ताशी उष:काल । सर्व सौरष्टाचा सुकाळ ।।
जीव माझा भरून आला । तुझ्या चिंतनी रंगला ।।
दास म्हणे उजाडले । खराखरी उजाडले ।।"[१६]

ख्रिस्ती भक्ती बरोबर रे. टिळकांनी आपल्या अभंगातून भारतभूमीची महती व्यक्त केली आहे.

१९२० नंतर सामाजिक सुधारणेसाठी अनेक चळवळी पहिल्या महायुध्दानंतर समाजजीवन ढवळून निघले

**जीवनसुखकर बनले**

याच काळामध्ये जनमानसावर गांधीवादाचा प्रभाव होता याच काळात राष्ट्रीय स्वरूपाचे काव्यलेखन होत होते. यामध्ये आपल्याला तुकडोजी महाराजांचा उल्लेख करता येईल यांनी ग्रामोध्दाराचे कार्य केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी प्रबोधनासाठी अभंग लेखन केले ते म्हणतात

"गाव हा विश्वाचा नकाशा । गाववरून देशाची परीक्षा
गावाचे भंगता अवदशा । येईल देशा"[१७]

१९४५ नंतर नवकाव्याला सुरूवात झाली या काळात भारतात जातीय दंगली झाल्या. भांडवलशाही मुळे सर्वसामान्य जनतेच्या जीवनात दैन्य निर्माण झाले. यंत्रयुगामुळे मानवी जीवन यंत्रवत झाले. या सर्व पार्श्वभूमीवर बा. सी. मर्ढेकरांनी अभंगलेखन केले त्यांनी विडंबन लेखन केले.

१९६० नंतर समाजावर चित्रपटाचा प्रभाव होता होता अभिव्यक्तीसाठी चित्रपटासारखे माध्यम निर्माण झाले. या कालखंडामध्ये ग. दी. माडगूळकरांनी चित्रपटासाठी अभंगलेखन केले.

"उठ पंढरीचा राजा वाढ वेळ झाला
थवा वैष्णवांचा दारी दर्शनाशी आला
पूर्व दिसे उमटे भानू
घुमे वारियाचा वेणू" [१८]

वि. दा. करंदीकरांनी विज्ञानविषयक निबंध लिहिले. मधुकर केचे यांनी आध्यात्मिक अभंग लिहिले आपल्या मनातील काव्य भावना व्यक्त केली.

स्वातंत्र्य मिळूनही खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य मिळाले नाही सामान्य माणूस कसा भरडल्या जातो याचे चित्रण

"स्वातंत्र्याने दिले मरण हातात
दुबळे गातात गवरून" [१९]

प्राचीन काळापासून कीर्तनासाठी भक्तीसाठी विपुल प्रमाणात अभंग लेखन झाले आहे नंतरच्या काळात सामान्य माणूस त्याच्या भावभावना जातिभेद यासारख्या अनेक वास्तववादी विषयावर अभंगलेखन झाले आहे.

**समारोप**

अभंग हा मराठीतील काव्यप्रकार आहे संतांनी जनजागृतीसाठी अभंग लिहिले. ओवी आणि अभंग हे मराठीतील जुने वाङ्:मय प्रकार आहेत. संत ज्ञानेशरांनी सुरू केलेल्या वारकरी संप्रदायाची परंपरा पुढे नेणाऱ्या अनेक संतांनी भक्तिमार्ग स्विकारला आणि अभंग निर्मिती केली. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम अशा अनेक मराठी संतांनी आपल्या आत्मानुभूतीच्या अभिव्यक्तीसाठी अभंग माध्यम वापरले. ओवी आणि अभंगाच्या माध्यमातून संत साहित्य जनमानसात पोहचले आधुनिक काळातही अनेक कवींनी अभंग लिहिले. महात्मा जोतीबा फुले, ना. वा. टिळक, लक्ष्मीबाई ठिळक, कुसुमाग्रज, माधव ज्युजियन, बा. भ. बोरकर, ग. दी. माडगूळकर, फ. मु. शिंदे, पी. सावळाराम, मर्ढेकर यांनी अभंग लिहिले. अशा प्रकारे अभंग वाङ्:मयाला समृध्द करण्याचे काम प्राचीन कवींनी केले तसेच आधुनिक कवींनी ही केले आहे. आजही अभंगाची लोकप्रियता कमी झाली नाही.

**निष्कर्ष**

१) ओवी आणि अभंग हे महारा  ट्रातील आवडते छंद म्हणून या छंदात मराठी सारस्वतांनी अभंगरचना केली आहे.

२) ओवी या छंदातून अभंगाची निर्मिती झाली त्याचे मोठा अभंग व लहान अभंग असे दोन प्रकार आहेत.

३) पहिले अभंगकार संत नामदेव आहेत वि. सा. खेचर यांनी नामदेवांना हे शास्त्र शिकविले.

४) संत नामदेव, संत ज्ञानेश्वर यांच्यानंतर अनेक संतांनी अभंगरचना करून हा वाङ्:मयप्रकार जनमानसात रूजविला.

५) आपले स्वानुभव व्यक्त करण्यासाठी संतांनी अभंग लेखन केले. त्यामुळे संत नामा म्हणे, ज्ञानदेव म्हणे, एक जनार्दनी म्हणे, तुका म्हणे असे अभंगातून म्हणतात.

६) ओवी आणि अभंगातून संतांनी समाजप्रबोधनाचे कार्य केले भक्तिसंप्रदायाचा पाया रचिला.

## संदर्भ टीपा


१. जोशी ना. ग. – "मराठी छंदोरचनेचा विकास" मौज प्रकाशन, गृह, मुंबई १९६४ पृ.क्र. २५
२. देशमुख माधव गोपाळ – मराठीचे साहित्यशास्त्र (ज्ञानेश्वर ते रामदास) कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे १९४० पृ. क्र. ७९
३. कुळकर्णी विठ्ठल अनंत – मराठी काव्यसमीक्षा, महारा  ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर १९४५ पृ.क्र. ३९.
४. जोशी ना. ग. – "मराठी छंदोरचनेचा विकास" मौज प्रकाशन, गृह, मुंबई १९६४ पृ.क्र. ५६.
५. तत्रैव – पृ.क्र. ३७.
६. तत्रैव – पृ.क्र. ८२.
७. तत्रैव – पृ.क्र. ३३५.
८. लबडे बाळासाहेब – 'अभंग स्वरूप आणि चिकित्सा खंड १' यशोदीप पब्लिकेशन, पुणे २०१३ पृ.क्र. १६, १७.
९. नाडकर्णी विठ्ठल जिवाजी – सार्थ पंचरत्न हरिपाठ व सार्थ चांगदेवपासस्टी, श्री ज्ञानेश्वर महाराज कृत केशव भिकाजी ढवळे, मुंबई, आठवी आवृत्ती, अभंग–१ पृ.क्र. २१.
१०.संत ज्ञानेशवर – श्रीसकल संतगाथा, गीताप्रेस, गोरखपूर, पृ.क्र. ९.
११.संपा. शिंदे लिला – 'फकिराच्या अभंगाचे पारायण' साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९४, पृ.क्र. ८५.
१२.तत्रैव – पृ.क्र. ११२.
१३.मजुमदार अनिता – 'प्राचीन मराठी वाङ्‌मयातील लोकतत्व', सविता प्रकाशन, औरंगाबाद, १५ नोव्होबर १९८८ पृ.क्र. २५.
१४.संपा. पिंगे, श्री. म. माळी गजमल – तुकारामाचे निवडक अभंग, व्हिनस प्रकाशन, पुणे, चवथी आवृत्ती, १९९४
१५.लबडे बाळासाहेब – 'अभंग स्वरूप आणि चिकित्सा खंड १' यशोदीप पब्लिकेशन, पुणे २०१३ पृ.क्र. ५७.
१६.उजागरे रे भास्कर कृष्ण – टिळकांची कविता, व्दितीय आवृत्ती, अभंगाजली प्रकाशन मुंबई १९१९. पृ.क्र. २८
१७.वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विरचित "ग्रामगीता", ग्रामगीता प्रकाशन, नागपूर २०११ पृ.क्र. ४
१८.माडगूळकर ग. दी. – वैशाखी, गदिमा प्रकाशन, पुणे, १९९३ पृ.क्र. १५६.
१९.शिंदे फ.मु. – फकिरांचे अभंग, सुरेश एजन्सी, पुणे, १९८६ पृ.क्र. १

## संदर्भ ग्रंथ सूची

१. कुळकर्णी विठ्ठल अनंत – 'मराठी काव्यसमीक्षा', महारा ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर १९४५.
२. उजागरे भास्कर कृष्ण – टिळकांची कविता, व्दितीय आवृत्ती, अभंगाजली प्रकाशन मुंबई १९१९
३. जोशी ना. ग. – "मराठी छंदोरचनेचा विकास" मौज प्रकाशन, गृह, मुंबई १९६४
४. देशमुख माधव गोपाळ – मराठीचे साहित्यशास्त्र (ज्ञानेश्वर ते रामदास) कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे १९४०
५. नाडकर्णी विठ्ठल जिवाजी – सार्थ पंचरत्न हरिपाठ व सार्थ चांगदेवपासस्टी, श्री ज्ञानेश्वर महाराज कृत केशव भिकाजी ढवळे, मुंबई, आठवी आवृत्ती.
६. मजुमदार अनिता – 'प्राचीन मराठी वाङ्‌मयातील लोकतत्व', सविता प्रकाशन, औरंगाबाद, १९८८
७. माडगूळकर ग. दी. – वैशाखी, गदिमा प्रकाशन, पुणे, १९९३
८. लबडे बाळासाहेब – 'अभंग स्वरूप आणि चिकित्सा' यशोदीप पब्लिकेशन, पुणे २०१३
९. संत ज्ञानेशवर – श्री सकल संतगाथा, गीताप्रेस, गोरखपूर
१०.संपा. शिंदे लिला – 'फकिराच्या अभंगाचे पारायण' साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९४
११.शिंदे फ.मु. – फकिरांचे अभंग, सुरेश एजन्सी, पुणे, १९८६